■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – ३०१ ■ शनिवार दि.१९ जुलै २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४
■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 301 ■ Saturday Dt.19 July 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांना खा.बजरंग सोनवणे यांचा फुल पाठिंबा? राजकीय संरक्षणाचा धक्कादायक नमुना!

महिलेची अवहेलना आणि महिला संरक्षणाच्या मुद्यावर जिल्ह्यात संतापाचा विस्फोट; बांध फुटण्याची शक्यता?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564

शिंदी गावचे रहिवासी असल्याने लक्ष्मण बेडसकर यांची केज तालुक्यातील राजकीय व सामाजिक क्षेत्राशी घट्ट नाळ जुळलेली!

## एका अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी संपूर्ण यंत्रणाच झुकतेय का? सामान्यांचे आणि महिलांचे हक्क कुठे गेले?

# केजच्या जबाबदार महिला आ. नमिता मुंदडांनी आता तरी मौन सोडून पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी स्पष्ट आणि ठाम भूमिका घ्यावी?

## व्हाईट कॉलर क्राईमचा बादशाह! लक्ष्मण बेडसकर यांनी पोलीस, शिक्षण विभाग, समाज आणि राजकारण यंत्रणा वापरून मार्गी लावले अनेक क्रूर कर्म?

## आरोपी अधिकाऱ्याला वाचवण्यासाठी लोकप्रतिनिधी स्वतः पुढाकार घेत असतील, तर मग लोकशाही व्यवस्थेचा अर्थच काय?

पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळेच संतोष देशमुखांना जीव गमवावा लागला, आणि आता बेपत्ता झालेल्या विनयभंग प्रकरणातील महिलेलाही संपवण्याचा डाव?

पोलीस अधिकारी, राजकीय नेते आणि लक्ष्मण बेडसकर यांचे व्हॉट्सअॅप कॉल तपासणे गरजेचे; सायबर क्राईम यंत्रणेद्वारे शोधून काढणे काळाची गरज बनली?

## खासदार बजरंग सोनवणे, माजी आ. पृथ्वीराज साठे यांच्यासह अनेक राजकीय नेत्यांशी गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांचे घनिष्ठ संबंध?

बीड । प्रतिनिधी

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका दलित समाजाच्या महिलेने विनयभंगाचा गंभीर आरोप केल्यानंतर जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. मात्र या प्रकरणात अपेक्षित कारवाई न होता, उलट बेडसकर यांना वाचवण्यासाठी राजकीय पातळीवरून जोरदार धडपड सुरू असल्याचे बोलले जात आहे.

संबंधित महिला केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यासाठी तब्बल नऊ तास बसून होती. गुन्हा दाखल करण्यासाठी ठाण मांडून बसलेले महिला अवघ्या १५ मिनिटांत गुन्हा मागे घेतला, केज पोलीस प्रशासनाकडून तात्काळ कारवाई न करणे, तसेच वरिष्ठांकडून दुर्लक्ष होणे, हे या प्रकरणाला वेगळे वळण देत आहे. बेडसकर यांना स्थानिक राजकीय वजनदार नेत्यांचा पाठिंबा असल्याची जोरदार चर्चा असून, या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप केल्याचा संशय अनेकांकडून व्यक्त केला जात आहे. या प्रकरणात पोलिसांनी गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ का केली? यामागे कोणते दबाव होते? आणि पीडित महिलेला न्याय मिळेल

▶ पान २ वर






### गटशिक्षणाधिकारी बेडसकर यांना विद्यमान खासदार बजरंग सोनवणे यांचा अघोषित पाठिंबा?

लक्ष्मण बेडसकर यांच्यावर महिलेने केलेल्या विनयभंगाच्या आरोपानंतरही कोणतीही ठोस कारवाई न होणे, यामागे विद्यमान खासदार बजरंग सोनवणे यांचा अघोषित पाठिंबा असल्याची जोरदार चर्चा सुरू आहे. शिक्षण विभागातील घोटाळे, बदल्यांमधील अनियमितता आणि आता महिला छेडछाड प्रकरण हे सर्व गंभीर आरोप असूनही बेडसकर यांच्यावर कारवाईचा बडगा न उगारणं म्हणजे सत्ताधाऱ्यांकडून मिळणारं अप्रत्यक्ष संरक्षणच मानलं जात आहे. बेडसकर यांच्यावरील तक्रार सार्वजनिक झाली असतानाही, सोनवणे यांनी अद्याप या प्रकरणावर एकही प्रतिक्रिया दिलेली नाही. त्यामुळे त्यांच्या मौनावर संशय व्यक्त केला जात आहे. राजकीय दबावाचा वापर करून पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा थांबवण्यात आली का? असा थेट सवाल सामान्य जनता आणि सामाजिक कार्यकर्ते करत आहेत. सामान्य शिक्षकांवर तत्काळ कारवाई होते, पण सत्तेच्या आडोशाला लपलेल्यांना संरक्षण का? हा प्रश्न सध्या शिक्षण विभागात गाजत असून, या सगळ्या प्रकरणात खासदार बजरंग सोनवणे यांची भूमिका स्पष्ट होणे अत्यंत गरजेचे बनले आहे.

### पोलीस यंत्रणेच्या घाळपणामुळे संतोष देशमुखांचा बळी; आता बेपत्ता महिलेला संपवण्याचा कट?

काही महिन्यांपूर्वी संतोष देशमुख यांची झालेली निर्घृण हत्या अजूनही जनतेच्या मनात ताजी असताना, आता त्या धाटणीचा भयावह कट पुन्हा उगम पावत असल्याची गंभीर चर्चा केज तालुक्यात सुरू आहे. पोलीस यंत्रणेच्या निष्क्रियतेमुळेच देशमुख यांना जीव गमवावा लागला, आणि आता बेपत्ता झालेल्या विनयभंग प्रकरणातील महिलेलाही संपवण्याचा डाव रचला जात असल्याचा संशय उपस्थित होतो आहे. पोलीस यंत्रणा, जी आधीच या प्रकरणात ढिसाळ आणि दुर्लक्ष करणारी भासते, तीच आता तिच्या सुरक्षिततेबाबत मौन का बाळगतेय? संतोष देशमुख प्रकरणातही पोलीस वेळेवर हस्तक्षेप करण्यात अपयशी ठरले होते आणि त्याचे परिणाम अत्यंत भीषण होते. आता पुन्हा त्या चुकांची पुनरावृत्ती होताना दिसत असल्याने महिलेच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### जबाबदार महिला आमदारांनी आतातरी मौन सोडावे?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर झालेल्या विनयभंगाच्या आरोपांनंतर संपूर्ण तालुक्यात संतापाची लाट उसळली आहे. शिक्षण विभागातील महिला कर्मचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर असताना, केजच्या जबाबदार महिला आमदार मात्र अद्यापही मौन बाळगून आहेत. महिलांवरील अत्याचाराच्या विरोधात नेहमी आक्रमक भूमिका घेणाऱ्या महिला नेत्यांनी या प्रकरणात तोंड उघडलेलेही नाही, ही बाब खेदजनक आहे. ज्या मतदारसंघातील अधिकाऱ्यावर गंभीर आरोप झाले आहेत, त्या मतदारसंघातील आमदारांनीच जर यावर भूमिका घेतली नाही, तर मग सामान्य महिलांनी आधार कुणाकडे पाहायचा? या प्रकरणात पोलीस आणि प्रशासकीय यंत्रणा दुर्बल ठरत असताना, राजकीय नेतृत्वाने तरी न्यायासाठी आवाज उठवणं अपेक्षित होतं. मात्र याउलट, राजकीय सोयीच्या गणितांमुळे महिलांच्या सुरक्षिततेचा मुद्दा दुर्लक्षित केला जातोय का? असा सवाल उपस्थित होतो.

### शिक्षण विभागातील कोट्यवधींच्या घोटाळ्यात आणि महिलेशी छेडछाड प्रकरणातही साधा गुन्हा नोंद नाही!

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्या कार्यकाळात शिक्षण विभागात कोट्यवधी रुपयांचे आर्थिक घोटाळे झाल्याची चर्चा गेले कित्येक दिवस सुरु आहे. याच अधिकाऱ्यावर एका महिलेने थेट विनयभंगाचा आरोप केला असतानाही, धक्कादायक बाब म्हणजे अद्याप एकही साधा गुन्हाही नोंदवला गेलेला नाही. या सगळ्या प्रकारामुळे शिक्षण विभाग, पोलीस यंत्रणा आणि राजकीय हस्तक्षेपावर गंभीर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. आर्थिक अनियमितता, शिक्षक बदल्यांमध्ये गैरव्यवहार, साहित्य खरेदीतील घोटाळे, अशा अनेक तक्रारींचा डोंगर असतानाही बेडसकर यांच्यावर कोणतीही ठोस कारवाई झाली नाही, हेच दर्शवतं की यंत्रणा पूर्णपणे बधीर झाली आहे. या प्रकरणात कोणी दबाव टाकतोय का? असा संशय निर्माण होतो आहे. आता या सगळ्यावर वरिष्ठ यंत्रणांनी लक्ष घालून कठोर आणि निष्पक्ष चौकशी सुरू करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

### कुचकामी पोलीस यंत्रणेची बेडसकर विनयभंग प्रकरणात सपशेल माघार?

गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण बेडसकर यांच्यावर एका महिला कर्मचाऱ्याने केलेल्या विनयभंगाच्या आरोपानंतरही पोलीस यंत्रणेकडून अद्याप ठोस कारवाई झाली नसल्यामुळे तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. बेडसकर यांच्याविरोधात गंभीर स्वरूपाची तक्रार दाखल होऊनही पोलीस विभागाने सपशेल माघार घेतल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. या प्रकरणात पोलीस प्रशासनाची भूमिका संशयास्पद ठरत असून, कायद्याच्या रक्षकांची ही कुचकामी भूमिका म्हणजे पीडितेच्या दुसऱ्या मानसिक छळासारखी असल्याचे सामाजिक कार्यकर्ते म्हणतात. गुन्हा दाखल न करणे, चौकशी पुढे न नेणे आणि आरोपीवर कोणतीही कार्यवाही न करणे, हे सर्व घटक या प्रकरणात राजकीय हस्तक्षेप असल्याचा स्पष्ट संकेत देत आहेत. महिलांवरील अत्याचाराविरोधात शून्य सहिष्णुतेचे धोरण जाहीर करणाऱ्या यंत्रणाच जर माघार घेत असतील, तर मग सामान्य महिलेला न्याय मिळणार तरी कसा?

# लिंबागणेश येथे विद्युत मोटार पंप चोरांचा सुळसुळाट

## नेकनुर शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण; नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष : डॉ.ढवळे

लिंबागणेश । प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश परीसरात काही महिन्यांपासून छोट्या मोठ्या भुरट्या चोऱ्या, विद्युत मोटारी चोरणे,रोहित्राचे वायर चोरी अशा घटना घडत असुन गेल्या ६ महिन्यात २२ विद्युत मोटार चोरीच्या घटना घडुन संबंधित प्रकरणी पोलिस प्रशासनाला तक्रारी करूनही पोलिस प्रशासन दुर्लक्ष करत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असुन शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या पंधरा दिवसात दोन वेळा विद्युत मोटार वायरच्या चोरीची घटना घडलेल्या मुळेवस्ती वरील शेतकरी रामदास मुळे यांनी विहीरीत पाणी असुन पिकांना पाणी देता येईना झाले तर जनावरांबरोबरच माणसांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण असल्याची संतप्त प्रतिक्रिया दिली. याचवेळी लिंबागणेश येथील सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी ३ महिन्यांपूर्वी विद्युत मोटार, पेटी आणि वायर चोरीची घटना घडल्याची लेखी



तक्रार नेकनुर पोलिस स्टेशनचे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना दिल्यानंतर त्यांनी फिर्याद घेतली नसुन वारंवार पाठपुरावा करूनही तपास झालाच नसल्याने नेकनुर पोलिस स्टेशन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप केला आहे. पावसाने ओढ धरल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर असतानाच शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या वाढत्या घटनांमुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले असुन चोरट्यांवर लगाम लावण्यासाठी पोलिस प्रशासनाने कठोर उपाययोजना करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

**मोटार वायर चोरीमुळे विहीरीत पाणी असुन पिकांना देता येईना; माणसांबरोबरच जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची अडचण : रामदास मुळे, डिगांबर मुळे**


लिंबागणेश येथील मुळे वस्तीवरील रोहित्रांवर जवळपास २० शेतकऱ्यांचे वीज कनेक्शन असुन गेल्या १५ दिवसांत मोटार वायर चोरीच्या घटनाची हि दुसरी घटना असुन माझ्या विहिरीवरील १५०० फुट वायर, विद्युत पेटी असा एकुण ३० हजार रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. त्यामुळे याचा बंदोबस्त करण्यात यावा अशी मागणी रामदास मुळे, डिगांबर मुळे, सूदाम मुळे, सुभाष मुळे, रामराजे मुळे, अशोक मुळे, नवनाथ मुळे, प्रकाश मुळे यांनी केली आहे.

**नेकनुर पोलिस प्रशासनाचे जाणिवपूर्वक दुर्लक्ष ; सपोनी गोसावी यांनी फिर्याद सुद्धा घेतली नाही : विक्रांत वाणी**

लिंबागणेश परीसरात गेल्या ६ महिन्यात २२ पेक्षा जास्त विद्युत मोटार पंप आणि वायर चोरीच्या घटना घडल्या आहेत. ३ महिन्यांपूर्वी माझ्या शेतातील विद्युत मोटार पंप, पेटी आणि वायर मिळुन २० हजारांचा ऐवज लंपास झाला होता. नेकनुर येथे सपोनी चंद्रकांत गोसावी यांना मोटार चोरणारांच्या टोळीची नावे सांगुनही त्यांनी माझी फिर्याद घेतली नाही. वारंवार पाठपुरावा करूनही तपासाच्या नावाखाली टोलवाटोलवी सुरू असुन नेकनुर पोलिस स्टेशनचे अधिकारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत आहेत त्यामुळे चोरीच्या घटनात वाढ होत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते विक्रांत वाणी यांनी केला आहे.

**पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा : डॉ.गणेश ढवळे**

लिंबागणेश परीसरात दुबार पेरणीचे संकट उद्भवले असतानाच शेतातील पाणबुडी, विद्युत मोटारी, वायर आदी शेतकरी उपयोगी साहित्य चोरीच्या घटनांमुळे शेतकऱ्यांसमोर नवं संकट उभे राहिले. यामुळे शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण असुन पोलिस प्रशासनाने चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशी मागणी डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.



# प्राचार्य डी.जी.तांदळे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

बीड शहर बचाव मंच परिवाराचे प्रमुख मार्गदर्शक प्राचार्य डी.जी. तांदळे सर (दादा) यांचा ७० वा वाढदिवस बीड शहर बचाव मंचच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रातील यशस्वीपणे कार्य करणाऱ्या मान्यवरांकडून मोठ्या उत्साहाने शहरातील राजाभाऊ वंजारे, छायाताई सरोदे, अभिजीत वैद्य संचलित 'जिव्हाळा' बेघर निवारा केंद्र परिवारासमवेत साजरा करण्यात आला.

यावेळी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी सोबत काम करताना आलेले अनुभव व जुन्या नव्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी डी.जी. दादांनी आयुष्यभर केलेल्या कार्यावर सर्वांनी प्रकाशझोत टाकून मन:पूर्वक हार्दिक शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच त्यांच्या उदंड आयुष्याची ईश्वरचरणी कामना केली. उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांनी मोठ्या सन्मानाने आदरपूर्वक सत्कार करत डी.जी. दादांना मन:पूर्वक भरभरून हार्दिक शुभेच्छा देऊन त्यांचा ७० वा वाढदिवस मोठ्या उत्साहाने साजरा केला. कॉम्रेड नामदेव चव्हाण, राजकुमार कदम, बीड शहर बचाव मंचाचे अध्यक्ष नितीन जायभाये, पत्रकार बालाजी जगतकर व जेष्ठ समाजसेवक मुकरमजानभाई पठाण, मंचचे कायदेशीर सल्लागार ॲड. अनिलजी बारगजे, ॲड. नितीनजी वाघमारे, (इस्लामपुरा) माजी नगरसेवक फारूक सय्यद, आ.प.चे जि.अ. अशोकराव येडे, इंटक कॉंग्रेसचे जि.अ. रामधनभाऊ जमाले, सेवानिवृत्ती पीएसआय बाबासाहेब जायभाये, वाहतूक नियंत्रण विभागाचे पोलीस उपनिरीक्षक वासुदेव मिसाळ, कृषी विभागाचे बाबासाहेब कोकाटे, मातोश्री विद्यालयाचे मुख्याध्यापक डी.डी. नागरगोजे, सेवानिवृत्त चौरे सर, सिटी हॉटेल ग्रुपचे परवेज कुरेशी, आप तक न्यूज चॅनलचे संचालक इमरोज भाई शेख, गोंधळी समाजाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्रभाऊ काटे आदी मान्यवर शुभेच्छुक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ना. पंकजा मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त सेवा पंधरवडा अंतर्गत रामगड येथे महंत योगी महाराज यांच्या हस्ते वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

भारतीय जनता पक्षाच्या राष्ट्रीय नेत्या पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत बीड तालुक्यातील श्री क्षेत्र रामगड येथे वृक्षारोपणाचा भव्य कार्यक्रम संपन्न झाला. उपसरपंच गणेश लांडे यांच्या संकल्पनेतून आणि पुढाकाराने आयोजित या उपक्रमात महंत योगी महाराज यांच्या शुभहस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या कार्यक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश प्रभावीपणे सर्वांपर्यंत पोहोचवण्यात आला.



पंकजाताई मुंडे यांच्या सामाजिक कार्यातून प्रेरणा घेऊन हा उपक्रम राबवण्यात आल्याचे उपसरपंच गणेश लांडे यांनी सांगितले. त्यांनी पंकजाताईंच्या समाजसेवा तसेच पर्यावरण रक्षणाच्या या कार्याला अधिक व्यापक स्वरूप देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला भाजपा तालुका उपाध्यक्ष विकास ढोरमारे, सरचिटणीस महादेव नागरगोजे, ज्येष्ठ नेते गणेश पुजारी, जनार्दन लांडे, सुनील क्षीरसागर, आदिनाथ लांडे, पांडुरंग क्षीरसागर, रामभाऊ लांडे, डॉ. शेळके, गजानन लांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महंत योगी महाराज यांनी उपस्थितांना वृक्षारोपणासोबतच त्यांचे संगोपन करण्याचे महत्त्व पटवून दिले. वृक्ष लावा, वृक्ष वाचवा, पर्यावरण जपा असा संदेश देत त्यांनी सर्वांना पर्यावरण संरक्षणासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपसरपंच गणेश लांडे यांचे विशेष योगदान लाभले. त्यांच्या नियोजनबद्ध नेतृत्वामुळे हा उपक्रम यशस्वी ठरला आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले गेले.

# रविकुमार सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील सुप्रसिद्ध व्यक्तिमत्व लेखक, कवी, नाटककार, स्पष्टवक्ता, अभ्यासू व्यक्तिमत्व आयु रविकुमार सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त दिनांक १७/०७/२०२५ रोजी शहरामध्ये दिवसभर विविध सामाजिक उपक्रम राबवण्यात आले. बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे यांच्या मार्गदर्शनाखाली सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये सकाळी भारतरत्न परमपूज्य डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक भीम नगर येथे अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. ग्रामीण रुग्णालय माजलगाव येथे रुग्णांना फळ वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. मूकबधिर निवासी शाळा माजलगाव येथे विद्यार्थ्यांना क्रीडा साहित्य वाटप करण्यात आले. तसेच यशोधरा बुद्ध विहार फुलेनगर माजलगाव येथे दुपारी



वृक्षारोपणाचा कार्यक्रम करण्यात आला. प्रत्येक जण वाढदिवस वेगवेगळ्या पद्धतीने साजरा करताना आपण पाहतो मात्र रविकुमार सोनवणे यांचा वाढदिवस हा सर्वांना आनंद देणारा ठरला. समाजाच आपण काही देणं लागतो या भावनेतून रविकुमार सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त मित्र मंडळी तर्फे हे उपक्रम राबविण्यात आले.

यावेळी श्रीहरी नाना मोरे, मा.कचरूजी तात्या खळगे, नवनाथ अण्णा धाईजे, राजेश भाऊ साळवे, भीमराव आप्पा टाकणखार, सचिन आबा डोंगरे, प्रदीप जिजा पटेकर, शेख बाबा, अभिजीत भैय्या पोटभरे, प्रा.लक्ष्मण मस्के, सुशीलाबाई चंद्रमोरे, कमलबाई डोंगरे, सीताबाई खळगे, मनोरमा सोनवणे, केसरबाई राऊत, रंगुबाई पाईक, वेणूबाई माने, सुनंदा घाडगे, शिवशीला निसर्गंध, भिमराव सोनवणे, बाबासाहेब जाधव सर, राजकुमार सोनवणे सर, प्रा.सुदर्शन स्वामी, ड.रवी उघडे, अशोक लांडगे सर, अक्षय भैया मोरे, सदानंद भैया प्रधान, किरण खळगे, दिपक टाकणखार, प्रा.नितीन फंदे, राजरत्न खळगे, बापूसाहेब येटाळे, रियाझ काझी, निलेश कांबळे, आकाश सावंत, धम्मपाल जावळे, राहुल मस्के, फारुकअण्णा सय्यद, विलेश कांबळे, दिपक शिंदे, सचिन टाकणखार, सचिन वैद्य, अमोल गायकवाड, आकाश टाकणखार, सुधाकर वाघमारे, प्रफुल्ल जावळे, शुभम प्रधान, ड.चेतन सातपुते, आदेश धाईजे, संकेत खळगे, किरण जावळे, युवराज नरवडे, विश्वजीत अलकुंटे, सतीश जाधव, ऋषिकेश पट्टेकर, अशोक मेंडके, दिलीप कुलतरखे आदी उपस्थित होते.

या कार्यक्रमासाठी किशोर सातपुते, संघानंद साळवे, राज सोनवणे, पत्रकार' अजिंक्य वाघमारे, नंदकिशोर निसर्गंध, सारंग स्वामी, नागेश जावळे, सचिन पट्टेकर, संदेश निसर्गंध, अजय सुरवसे, सिद्धार्थ निसर्गंध, आशिष धाईजे, सुबोध खळगे, ऋषिकेश सोनवणे, विशाल सोनपसारे, सुजल खळगे, विकास सावंत आदींनी परिश्रम घेतले.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी यशराज पंडित यांची निवड

गेवराई । प्रतिनिधी

डॉ. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी युवा नेते यशराज भैय्या पंडित यांची एकमताने निवड करण्यात आली आहे. शुक्रवार दिनांक १८ रोजी झालेल्या बैठकीत सदरील निवड जाहीर करून, उर्वरित कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.




गेवराई येथील शासकीय विश्रामगृहात दिनांक १८ जुलै २०२५ रोजी डॉ. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सव समितीची बैठक घेण्यात आली असून, सर्वानुमते यशराज भैय्या पंडित यांची अध्यक्ष म्हणून निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्ष म्हणून प्रभाकर तात्या पिसाळ, मनोज तात्या हजारे, सचिव शरद नाना मोटे, ज्ञानेश्वर माऊली पवार, पप्पू गायकवाड, सहसचिव अण्णासाहेब राठोड लक्ष्मण चव्हाण, कोषाध्यक्ष उद्धव बापू मडके, सह कोषाध्यक्ष ॲड. श्रीनिवास ढाकणे, ॲड. आबासाहेब सवाशे, माजी नगरसेवक रवींद्र बोराडे, अरुण मस्के, कार्याध्यक्ष रणजीत घुंभार्डे, सहकार्याध्यक्ष शिनूभाऊ बेद्रे, डिजिटल मीडिया प्रमुख रवींद्र पवार, संघटक सय्यद एजाज, किशोर वादे, प्रसिद्धी प्रमुख सुभाष सुतार, दिनकर शिंदे, अमोल वैद्य यांची निवड करण्यात आली असून मिरवणूक प्रमुख इनामदार, प्रभाकर भालशंकर, शेख अमजद बब्बू यांना संधी देण्यात आली आहे.

सदरील कार्यकारणी सर्वानुमते जाहीर करण्यात आली आहे. या बैठकीला राजाराम कानडे सर, खाजेकर सर, कमलाकर हातागळे, विलास अंकल सुतार, माजी नगराध्यक्ष ब्रह्मदेव धुरंधरे, माजी नगरसेवक भरत गायकवाड, ॲड. सोमेश्वर कारके संतोषजी सुतार, दीपक नाना सुतार, विजय दादा सुतार, प्रदीप सुतार, रजनीकांत सुतार, विशाल जिजा थोरात, मायकल सुतार, रणजीत सराटे, राहुल सुतार, तीर्थराज धुरंधरे, प्रदीप कांबळे, विनोद कांबळे, राणू कानडे, अक्षय पवार, बल्ली भैया शिंदे, राजेंद्र सुतार, सुभाष सुतार, अमोल सुतार, अमोल मधुकर सुतार, बाळराजे थोरात, बंडू पवळे, विकास कारके इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# भारतीय जनता पार्टी बीड तालुका ग्रामीण कार्यकारणी सदस्यपदी गोरख बाबर यांची निवड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांचे नियुक्ती घोषित करण्यात आले आहे. यामध्ये पिंपळनेर परिसरामध्ये भारतीय जनता पार्टी या पक्षामध्ये अनेक दिवसापासून या पक्षांमध्ये अविरतपणे काम करणारे नेतृत्व, ग्रामीण भागातील गावागावांमध्ये लोकांच्या समस्या जाणून घेणारे व त्यांच्या प्रश्नाला सातत्याने आपल्या पदाच्या माध्यमातून न्याय देणारे आतापर्यंत खूप लोकांचे कामे यांनी केलेले आहेत.



महाराष्ट्र सरकारच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचण्याचा काम अविरतपणे केलेला आहे म्हणूनच त्यांना त्यांच्या या कामाची पोच पावती भारतीय जनता पार्टीच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी घेतलेले आहे म्हणून गोरख तुळशीराम बाबर यांची भारतीय जनता पार्टी बीड तालुका ग्रामीण कार्यकारणी सदस्य या पदावर निवड करण्यात आली. भाजपचे ध्येय धोरणाला अनुसरून पक्ष कार्य व पक्षाचे विचार तळगाळात पोहोचण्यासाठी आपली निवड केली आहे, या निवडीबद्दल सर्व स्तरातून गोरख बाबर यांच अभिनंदन होत आहे.



मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी तसेच त्यांच्या सडेतोड, निष्पक्ष आणि लोकहितवादी पत्रकारितेची दखल घेत त्यांना हा सन्मान प्रदान करण्यात आला. आझाद पत्रकार तसेच बीड न्यूज आप तक चे मुख्य संपादक शेख इमरोज शरीफ यांना प्राचार्य डी.जी. तांदळे सर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे, ॲड. अनिल बारगजे, मुकरमजान पठाण, नितीन जायभाय, ॲड. अनिल वाघमारे आदी मंचावर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

# विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप

परतूर । प्रतिनिधी

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ब्राह्मणवाडी येथे शालेय साहित्याचे तुळजाभवानी अर्बन बँक शाखा आष्टी मार्फत विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले आहे. या कार्यक्रमानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक यांनी तुळजाभवानी अर्बन बँक शाखा प्रबंधक (मॅनेजर) जाधव तसेच ऑफिसर शेजुळ, सरोदे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक पत्रकार विलास सोळंके यांचा सत्कार शाळेच्या वतीने केला आहे.

या कार्यक्रमाच्या निमित्ताने गावातील समस्त नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला आहे



तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्तात्रेय सोळंके, अमर सोळंके यांचेही अमूल्य सहकार्य लाभले तसेच शाळेतील सहशिक्षक पाटील, सय्यद, सोळंके, सूर्यवाड, कातवाडे यांचीही उपस्थिती होती. कार्यक्रम मोठ्या उत्साहामध्ये आणि आनंदामध्ये पार पडला.



# राजस्थानी प्राथमिक विद्यालयातील कब बुलबुल पथकाच्या वतीने 'श्रीं'च्या पालखीचे स्वागत

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड भागातील नावाजलेल्या राजस्थानी सेवा समाज संचलित मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाच्या कब बुलबुल पथकाने दि.१७ जुलै रोजी शहरात आगमन झालेल्या शेगांव येथील श्री गजानन महाराजांच्या पालखीचे स्वागत करून दर्शन घेतले.

नेहमीच वेगवेगळे उपक्रम राबवत असलेली पेठ बीड भागातील नावाजलेली मदनलाल सारडा राजस्थानी प्राथमिक विद्यालयाने गुरुवार दि.१७ जुलै रोजी पंढरपूरहुन शेगाव कडे निघालेल्या श्री गजानन महाराज यांच्या पालखीचे पेठ बीड भागात आगमनावेळी त्यांचे शाळेतील कब बुलबुल पथकाने हात जोडून व वारकरी संप्रदायाची परंपरा असलेले भगवे झेंडे खांद्यावर घेऊन वारकऱ्यांचे स्वागत केले तसेच श्रींच्या पादुकांचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी विद्यार्थ्यांनी पालखीतील वारकऱ्यांची वेशभूषा त्यांची शिस्तबद्ध राहणीमान व वेळेचे महत्व हे गुण जाणुन घेतले. यावेळी शाळेचे जेष्ठ संचालक राधेश्याम कासट अशोक मंत्री तसेच संतोष सोहनी अमित मंत्री, रामप्रसाद बियाणी विनोद पिंगळे यांनी विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप केले. मुख्याध्यापक गिरीष सोहनी यांच्या मार्गदर्शनाखाली व हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे ज्येष्ठ शिक्षक तंबरे सर, कब बुलबुल पथकाचे प्रमुख विनय मंत्री सर, गणेश दोडे सर, पवन लड्डा सर, वैभव बियाणी सर, सौ.घोडके मॅडम, राधेश्याम पारीख विशाल जमदाडे यांनी परीश्रम घेतले.

# टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी नोंदणी करावी : आ. विजयसिंह पंडित

गेवराई । प्रतिनिधी

टिपरे आणि सोंग या लोककलेचे गेवराई शहराशी अतुट नाते आहे, या लोककलेची परंपरा जोपासण्याचे काम जाणीवपूर्वक आ. विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून सुरु आहे. यावर्षीच्या टिपरे महोत्सवाचे आयोजन बुधवार, दि.३० जुलै रोजी होणार आहे. टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत स्पर्धेसाठी संघ आणि वैयक्तिक कलाकारांनी आपली नोंदणी करण्याचे आवाहन आ.विजयसिंह पंडित यांनी केले आहे.

महोत्सवाच्या पुर्व तयारीसाठी परिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. सुभाष निकम यांच्या अध्यक्षतेखाली आज बैठक संपन्न झाली. यामध्ये स्पर्धेची नियमावली, पारितोषिक यांसह इतर बाबींवर चर्चा झाली.

सालाबादा प्रमाणे याहीवर्षी शारदा प्रतिष्ठान, गेवराई यांच्यावतीने गेवराई विधानसभा मतदार संघाचे लोकप्रिय आमदार विजयसिंह पंडित यांच्या माध्यमातून बुधवार, दि.३० जुलै रोजी सायं. ६ वाजता बाजारतळ, गेवराई येथे भव्य टिपरे महोत्सवाचे आयोजन गेवराई शहरात करण्यात येणार आहे. लोककलेचा आगळावेगळा दुर्मिळ ठेवा जतन करून संस्कृती संवर्धन करण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन करण्यात येते. लोककलेला राजाश्रय देऊन ही परंपरा नव्या पिढीमध्ये रुजावी म्हणून भरघोस बक्षिसांचा वर्षाव यासाठी केला जातो. टिपरे महोत्सवाच्या आयोजना संदर्भात साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून बैठकीचे आयोजन करण्यात आले. यावेळी लोकशाहीरांना अभिवादन केल्यानंतर गढी येथे झालेल्या दुर्दैवी अपघातातील मृत तरुणांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. ज्येष्ठ कलावंत ॲड. सुभाष निकम यांचा सत्कारही या बैठकीत करण्यात आला. बैठकीला शाहीर विलास सोनवणे, ज्येष्ठ कलावंत प्रशांत रुईकर, विष्णूपंत खेत्रे, संघ प्रतिनिधी महेश मोटे, दत्ता दाभाडे, अक्षय पवार यांच्यासह आयोजन समितीचे सदस्य उपस्थित होते.



नागपंचमीच्या निमित्ताने टिपरे, सोंग आणि भोलोबा गीत या कला अविष्कारांचे स्पर्धात्मक स्वरुपात आयोजन केले जाते. टिपरे महोत्सवात प्रत्यक्ष टिपरे आणि सोंग याचे सादरीकरण होते तर भोलोबा गीत स्पर्धेसाठी व्हिडीओ चित्रीकरण करून त्या माध्यमातून त्याचे परिक्षण करण्यात येते. यावर्षी नागमंत्री थाळा वादन या कला अविष्काराचा समावेश महोत्सवात करण्यात आला असून ही कला जोपासणाऱ्या मान्यवर कलावंतांचा सत्कार शारदा प्रतिष्ठानकडून केला जाणार आहे. या महोत्सवात प्रथम संघास रु.३३,३३३, द्वितीय संघास रु.२२,२२२ व तृतीय संघास रु.११,१११ रोख व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.५,५५५ यासह सन्मान चिन्ह देण्यात येणार आहे. उत्कृष्ट पात्र सजावट (टिपरे) यासाठी प्रथम ५,०००, द्वितीय ३,०००, तृतीय २,००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,००० यासह अशी वैयक्तिक पारितोषिके दिली जाणार आहेत. याशिवाय पंचमीनिमित्ताने सोंग घेण्याची परंपरा असल्याने उत्कृष्ट सोंग घेणाऱ्या कलावंतांना प्रथम ५,०००, द्वितीय ३,०००, तृतीय २,००० व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,५०० यासह तर उत्कृष्ट वाद्य वादकास प्रथम ३,०००, द्वितीय २,०००, तृतीय १,५०० रोख व दोन उत्तेजनार्थ पारितोषिके प्रत्येकी रु.१,००० यासह पारितोषिक व सन्मान चिन्ह देवून गौरविण्यात येणार आहे. यावर्षी लक्षवेधी कला सादरीकरण करणाऱ्या सहा कलावंतांचा रोख रक्कमेसह सन्मानचिन्ह देवून गौरव होणार आहे. त्याचबरोबर भोलोबा (फेर) गीत स्पर्धेसाठी प्रथम रु.५,०००, द्वितीय रु.३,०००, तृतीय रु.२,००० आणि उत्तेजनार्थ प्रत्येकी रु.१,००० दोन विजेत्या संघांना सन्मानचिन्हासह देऊन गौरविण्यात येणार आहे. भरघोस बक्षिसांचे वाटप यानिमित्ताने करण्यात येणार आहे. हा महोत्सव कलेच्या व परंपरेच्या प्रोत्साहनासाठी आयोजन करण्यात आले असल्याची माहिती शारदा प्रतिष्ठानच्यावतीने आ. विजयसिंह पंडित यांनी दिली.

आ. विजयसिंह पंडित यांच्या पुढाकारातून सुरु झालेल्या टिपरे महोत्सवामुळे गेवराई शहरातील कलावंतांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शहरातील गल्लोगल्ली टिपरे संघ सराव करताना दिसत आहे. टिपरे महोत्सवासाठी प्रा.बाबु वादे – ७५८८६३५११२, किशोर सोनवणे – ९४२३३५२४०१ आणि ओम मोटे – ९४२०८७४५७८ या क्रमांकावर नोंदणी करण्याचे आवाहन शारदा प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

# दैनिक महाराष्ट्र आरंभच्या बातमीचा इफेक्ट : अखेर साफसफाईची हालचाल सुरू!

# गेवराई नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाला आली खडबडून जाग

## शब्दांची ताकद काय असते हे 'आरंभ'ने दाखवून दिलं; सत्य पत्रकारितेचा झंझावात!

गेवराई । प्रतिनिधी

संजय नगर भागातील नाली सफाई गेल्या दोन महिन्यापासून होत नसल्यामुळे येथील नागरिक त्रस्त होतें त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती निर्माण झाल्याचे चित्र दिसत होते आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरत आहे या दुर्गंधीमुळे तासाचे प्रमाण वाढत चालले आहे तासांपासून डेंगू मलेरिया सारखी आजार होण्याची भीती लहान मुले व महिला जेष्ठ नागरिक यांना खूप त्रास होत होता सध्या पावसाळ्याचे दिवस असल्यामुळे थोडा जरी पाऊस आला तरी नाल्या तुटुंब भरतात पाणी रस्त्यावर आहे. त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून खाण पाण्यातून चालावे लागते. याच मुद्द्यावर दैनिक महाराष्ट्र आरंभ या वृत्तपत्राने दिनांक १८ जुलै २०२५ शुक्रवार रोजी च्या अंकात संजय नगरात शहराच्या स्वच्छतेवर अस्वच्छतेचा वनवास संपेना या संदर्भात बातमी प्रकाशित केली असता यासंदर्भात नगरपरिषद स्वच्छता विभागाने याची पूर्णपणे दखल घेतली असल्याची माहिती मिळाली आहे.






सायं. दैनिक महाराष्ट्र आरंभ
मुख्य संपादक दीपक थोरात – मो.9860898564

संजय नगरात मांडुरके विक्रमाच्या कार्यकिर्दीत शहराच्या स्वच्छतेवर अस्वच्छतेचा वनवास संपेना

खाजगी टेंडर मुळांवर स्वच्छतेची गाडी येईल का रुळावर?

अनेक भागात नालीसफाईला मुहूर्त मिळेना स्वच्छता विभागाला कांहीच कळेना
मुख्याधिकारी, उघडा डोळे बघा नीट स्वच्छतेची यंत्रणा करा नीट

गेवराई । प्रतिनिधी

संजय नगर भागांमधील नालीसफाई गेल्या दोन महिन्यापासून केली नाही येथील नागरिकांनी वेळोवेळी नगरपरिषद कर्मचाऱ्यांना सांगू न ही नालीसफाई होत नाही त्यामुळे रोगराई पसरण्याची भीती वाटत आहे. गेल्या दोन महिन्यापासून नालीतील घाण न काढल्यामुळे आजूबाजूच्या परिसरात दुर्गंधी पसरली आहे या दुर्गंधीमुळे डासांचे प्रमाण वाढला आहे. डासांपासून डेंगू मलेरिया यासारखे आजार होण्याची भीती आहे. लहान मुले महिला ज्येष्ठ नागरिक यांना यापासून खूप त्रास होत आहे सध्या पावसाळ्याचे दिवस असल्या थोडासा जरी पाऊस पडला तरी सर्व आल्या तुडुंब भरतात आणिनाली मधील घाण पाणी रस्त्यावर येत आहे त्यामुळे नागरिकांना रस्त्यावरून घाण पाण्यातून चालावे लागते.

सविस्तर वृत्त असे की सध्या जोरदार पावसाला सुरुवात झाली असली तरीही अद्याप गेवराई शहरातील संजय नगर भागात नालेसफाई झालेली नाही. गेली नेहमीच नालेसफाईकडे पूर्णपणे दुर्लक्ष

मुख्याधिकारी तथा प्रशासक मांडुरके साहेब नुसतं टेंडर देऊन जमत नसतं प्रत्यक्षात मोहिम फत्ते कराच

लहान मुले महिला वृद्ध व्यक्ती हे आजारी पडू नये म्हणून नगरपालिका मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री. मांडुरके साहेब नुसतं टेंडर देऊन जमत नसतं तर प्रत्यक्षात मोहीम फत्ते करा गेल्या अनेक दिवसापासून संजय नगर भाग हा स्वच्छते पासून वंचित आहे याकडे आपण गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन संजय नगर भागातील नाली सफाई करण्याचे ताबडतोब आदेश द्यावे अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

केले आहे. त्यामुळे विविध शहरातील नाले तुंबलेल्या अवस्थेत आहेत. सर्वच शहरांमध्ये पावसाळ्याच्या आधी नालेसफाई करण्यात येते. गेवराई नगरपरिषदेल मात्र, अद्याप तसा मुहूर्त गवसलेला नाही. नालेसफाई

पान २ वर

18 Jul 2025 - Page 1 | epaper.maharashtraaarambh.com
Powered by softisky | 9764331134

सविस्तर वृत्त असे की, गेवराई शहरातील संजय नगर भागातील लोकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला होता. दररोज नित्यनेमाने नाल्या स्वच्छ होत नसल्यामुळे अस्वच्छतेच्या त्रासाला तेथील सामान्य जनता वैतागली होती. त्यामुळे स्वच्छ गेवराई सुंदर गेवराई या नावाला खाजगी टेंडर मुळे वाट लागणार असल्याचे निदर्शनात येत आहे. स्वच्छता विभागाने शहरात स्पॉट पाहणी करून ज्या ठिकाणी नाल्या स्वच्छ होत नाहीत यासंदर्भात संबंधित विभागाच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना तंबी द्यावीशी वाटते गेवराई शहरात विविध ठिकाणी रस्त्यावर कचरा आढळून येत आहे. खाजगी टेंडरने स्वच्छतेच्या नावाला मोठा धब्बा लावल्याचे या अनुषंगाने आपल्याला पाहायला मिळते याकडे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन साहेब यांनी एकदा आढावा बैठक घेऊन येतील होणारा मनमानी कारभार सुता सारखा सरळ करावा अशी मागणी होत आहे.

### दुसऱ्या दिवशीच बदल दिसला, दै. महाराष्ट्र आरंभच्या बातमीचा तात्काळ इफेक्ट!

दैनिक महाराष्ट्र आरंभने काल गेवराई नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागातील हलगर्जीपणावर प्रकाश टाकत केलेल्या सविस्तर बातमीचा सकारात्मक पडसाद उमटू लागले आहेत. या बातमीचा थेट परिणाम म्हणून गेवराई नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाला खडबडून जाग आली आहे. संजयनगर भागातील रस्त्यांवरील कचऱ्याचे ढीग, नाल्यांची सफाई न होणे यावर महाराष्ट्र आरंभने जोरदारपणे आवाज उठवल्यानंतर अखेर प्रशासन जागे झाले आहे. तातडीने प्रमुख रस्त्यांवरील साफसफाई, नालीची सफाईची मोहीम हाती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. विशेष म्हणजे, याआधी दुर्लक्षित असलेल्या भागात सुद्धा स्वच्छता कर्मचारी तैनात करण्यात येणार असल्याची देखील माहिती मिळत आहे. स्थानिक नागरिकांनी दैनिक महाराष्ट्र आरंभचे आभार मानत म्हटले की, सामान्य जनतेच्या अडचणीला वाचा फोडणाऱ्या माध्यमामुळेच ही हालचाल झाली आहे. अन्यथा प्रशासन केवळ डोळेझाक करत होते. या निमित्ताने पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, जबाबदार आणि निर्भीड पत्रकारिता समाजात सकारात्मक बदल घडवू शकते. पुढील काळात ही स्वच्छता मोहीम केवळ एका प्रतिक्रियेसाठी नसून सातत्याने सुरू राहील, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

---

### नाथ महाराज मंदिर परिसरात सर्वत्र पसरले घाणीचे ढीग उचलून स्वच्छता करा यासह अनेक मागण्याचे नगरपरिषदेला दिले निवेदन

# मागण्या पूर्ण न केल्यास उपोषण करणार : फावडे

धारूर । प्रतिनिधी

किल्ले धारूर शहरातील नगरपरिषद अंतर्गत गायकवाड गल्ली येथील प्रसिद्ध नाथ महाराज मंदिर असून अनेक भाविक राज्यभरातून नाथ महाराज यांचे दर्शन देण्यासाठी येत असतात व रोज सकाळी परिसरा सह तालुक्यातील भाविक रोज नित्य दर्शन घेण्यासाठी येत असतात मंदिराच्या या पूर्ण परिसरात मागच्या अनेक दिवसापासून सर्वत्र घाणीचे लोट पसरले असल्याने येणाऱ्या भाविकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

दर्शनासाठी आलेल्या भाविकांना परिसरात पूर्ण पसरलेला दुर्गंधीमुळे आजार होऊ शकतात व डेंग्यू, मलेरिया या सारखे अनेक आजारानं आमंत्रण मिळू शकते यावर नगरपरिषद प्रशासनाने सोई सुविधा उपलब्ध करून होणाऱ्या गैरसोई, समस्या टाळाव्यात यासाठी दि.१८ जुलै शुक्रवार रोजी नाथ महाराज मंदिर परिसरातील अनेक युवकांनी एकत्र येऊन नगरपरिषद प्रशासनास निवेदन देऊन सर्वत्र झालेली घाणीचे लोट तात्काळ उचलून स्वच्छता सह परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवावे व अनेक मागण्याची निवेदन नगरपरिषद प्रशासनास दिले आहे.

शहरातल्या प्रसिद्ध नाथ महाराज परिसरातील मंदिराच्या अवती भोवती अनेक समस्या असून प्रशासनाने वेळीच




लक्ष देऊन तात्काळ समस्या सोडून केलेल्या मागण्या पूर्ण कराव्यात व मंदिराच्या चारही बाजूने सिमेंट कंपाऊंड असताना परिसरातील नागरिकांनी कंपाउंडच्या आत मोठ्या प्रमाणात घाण कचरा, हाडाचे भाग टाकल्याने परिसरात कचऱ्याचे ढिगारे साचले असून परिसर सर्वत्र घाण झालेला आहे व कंपाऊंडच्या आत कचरा, व मांसाहारी हाडाचे खोड टाकल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली आहे व या पुढे कोणी टाकू नये यासाठी प्रशासनाने योग्य त्या सूचना करून विनाकारण कंपाउंडच्या आत कचरा टाकणाऱ्यांवर नगरपरिषद प्रशासन व धारूर पोलीस प्रशासनाने कारवाई करावी अशी मागणी यावेळी निवेदनात युवकांनी केली आहे.

नाथ महाराज मंदिर हे ऐतिहासिक मंदिरापैकी एक मंदिर असून या मंदिराच्या परिसरात कायम स्वच्छ परिसर ठेवण्यासाठी धारूर नगरपरिषदेने लक्ष देण्याची मागणी यावेळी निवेदनात केली आहे व झालेली दुर्गंधी तात्काळ उचलून परिसर स्वच्छ करावा यासह केलेल्या मागण्या मंदिर परिसरात १०० झाडांची लागवड करण्यात यावी, मंदिर परिसरात दर आठ दिवसला नगर परिषदे मार्फत स्वच्छता करण्यात यावी, येणाऱ्या भाविकांना बसण्यासाठी मंदिर परिससरात सिमेंट बाकडे बसविण्यात यावेत, मंदिराचे सुरक्षा करीता प्रवेशद्वारा जवळ लोखंडी गेट बसविण्यात यावे. या मागण्याचे निवेदन धारूर नगरपरिषदेला यावेळी युवकांनी दिले व प्रशासनाने सोईसुविधा उपलब्ध तात्काळ करून दखल घ्यावी अशी मागणी केली आहे व मागण्या पूर्ण न केल्यास धारूर नगरपरिषद कार्यालय समोर दि.३१ जुलै २०२५ रोजी पासून नगर परिषद कार्यालय समोर उपोषण करणार असल्याचे निवेदनात निवेदनकर्ते यांनी म्हटले आहे.

यावेळी प्रशासनास मागण्याची निवेदन देण्यासाठी उपस्थित पत्रकार रोहित फावडे, पृथ्वीराज औताडे, वैभव चव्हाण, ॲड.मोहन भोसले, रविराज फावडे, जय शिंदे, अमर वैष्णव, अमोल सिरसट, सोनू शिंदे, बबलू गायकवाड, अमर भांडवलकर, विनय शिंदे, योगेश सावंत, ऋषी गाकवाड, हर्ष डूबे, सिद्धार्थ गायकवाड, वैभव खावतोडकर या सह गायकवाड गल्लीतील मोठ्या संख्येने युवक उपस्थित होते.

---

# बीड जिल्हयात २४ ठिकाणी नवीन इमारत बांधण्यासाठी ९ कोटी ४० लाखाची तरतूद

### राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला मिळणार नवीन इमारती; ना. पंकजा मुंडे यांच्या कामाचा धडाका

मुंबई । प्रतिनिधी

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या नियोजनबद्ध आणि गतिशील काम करण्याच्या पध्दतीमुळे राज्यात ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. जिल्हा वार्षिक योजनेतून इमारत बांधकामासह दवाखान्याची दुरूस्ती, स्वच्छतागृह व उपकरण खरेदी यासाठी ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपयांची तरतूद करण्यात आली आहे.



पर्यावरण व पशुसंवर्धन विभागाची सुत्रे हातात घेतल्यापासून ना. पंकजाताई मुंडे यांनी एका मागोमाग एक चांगल्या निर्णयासह आपल्या कामाचा धडाका सुरू केला आहे. पशुसंवर्धनला कृषी व्यवसायाचा दर्जा देणारे देशातील पहिले राज्य करण्याचा निर्णय घेतल्यानंतर राज्यातील पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती देण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे राज्याच्या सात महसूली विभागातील ३४ जिल्ह्यात एकूण ३५७ ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत. नवीन इमारत बांधण्याकरिता २८७ कोटी ७६ लाख ४४ हजार तर दुरुस्तीसाठी १२१ कोटी ११ लाख ८२ हजार, स्वच्छतागृह साठी २५ कोटी १७ लाख २० हजार, विविध उपकरणे खरेदीसाठी २४ कोटी ३५ लाख ८८ हजार असा एकूण ४५८ कोटी ४१ लाख ३४ हजार रूपये निधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत ही सर्व कामे प्रस्तावित करण्यात येणार आहेत.

#### बीड जिल्हयात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख

बीड जिल्हयात सर्व सहाही मतदारसंघात २४ इमारतीसाठी ९ कोटी ४० लाख रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. राज्यात ज्या ठिकाणी पशुवैद्यकीय दवाखान्याला नवीन इमारती मिळणार आहेत, त्यांची विभागनिहाय संख्या पुढील प्रमाणे मुंबई विभाग – ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यात १३, पुणे विभाग – पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर जिल्ह्यात १२५, नाशिक विभाग – नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, अहमदनगर जिल्ह्यात ५५, छत्रपती संभाजीनगर विभाग – छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, बीड जिल्हयात ५१, लातूर विभाग– लातूर, नांदेड, धाराशीव, हिंगोली जिल्हयात ३९, अमरावती विभाग– अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशीम, यवतमाळ जिल्हयात ३८, नागपूर विभाग– नागपूर, भंडारा, वर्धा, चंद्रपूर, गोंदिया, गडचिरोली जिल्ह्यात ३६ अशा एकूण ३२७ ठिकाणी नवीन इमारती साठी आर्थिक तरतूद करण्यात आली आहे.

---

## नगरपालिकेसमोरच्या रस्त्याची मालकी कोणाकडे?

### प्रशासनाने आगोदर जाहीर करावे : उल्हास गिराम

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील प्रमुख रस्त्या पैकी एक असणारा छत्रपती शिवाजी महाराज चौक ते राजुरी वेस, या रस्त्याची चाळन झाली आहे. नगर पालिका, जिल्हापरिषद याचा मार्गांवर असुन या रस्त्यावर शेकडो लहान मोठे खड्डे पडले आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी या रस्त्यावरील खड्या संदर्भात नगरपालिके कडे विचारणा केली तर संबंधित रस्ता आमच्या कडे नसून हा रोड सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ) कडे असल्याचे सांगितले, बांधकाम विभागाला विचारले असता त्यांनी नगर पालिकेकडे असल्याचे सांगितले. संबंधित रस्त्याचा मालक कोण? हे प्रशासनाने आगोदर जाहीर करावे, असे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी पत्रकात म्हंटले आहे.



सोमवारी या रस्त्याच्या समस्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्याच्या भेटी घेणार असुन. येत्या महिनाभरात हा रस्ता नव्याने तयार व्हावा या साठी पाठपुरावा करणा असल्याचे उल्हास गिराम यांनी सांगितले. बीड शहरातील मुख्य बाजारपेठेत जाणारा हा मार्ग प्रमुख प्रशासकीय कार्यालयाला ही जोडला आहे. शाळा, महाविद्यालये, बाजार मुख्यालयाला हा प्रमुख रस्ता असुन अश्या उडवा उडवीच्या उत्तराने चीड निर्माण होत आहे. सामान्य जनतेच्या भावनांशी हे प्रशासन खेळत आहे. उप मुख्यमंत्री अजितदादा पवार सध्या जिल्ह्याचे पालक मंत्री आहेत. त्यांनी या रस्त्याचे गांभीर्य घेऊन नव्याने तयार करावा या साठी त्यांना पत्र पाठवणार असल्याचे उल्हास गिराम यांनी कळवले.

---

# धक्कादायक: रत्ननगर तांडा जळगव्हाण येथील अंगणवाडी सेविका सहा महिन्यांपासून गैरहजर

### तिसऱ्या अपत्याची माहिती लपविल्याचा आरोप; राठोड यांच्या निवेदनातुन माहिती उघड

सिरसाळा । प्रतिनिधी

जळगव्हाणजवळील रत्ननगर तांडा येथील अंगणवाडी सेविका मागील सहा महिन्यांपासून अंगणवाडी केंद्रातून गैरहजर असल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. प्रसुतीसाठी त्यांनी खासगी कारणांचा दाखला दिला असला तरी, तिसऱ्या अपत्याची माहिती लपवण्यासाठीच त्या गैरहजर असल्याचा गंभीर आरोप आता होत आहे. यामुळे बालकांच्या पोषण आणि शिक्षणाच्या हक्कावर गदा येत असून, प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

रत्ननगर तांडा येथील अंगणवाडी सेविका सुनीता उत्तम जाधव या गेल्या सहा महिन्यांपासून अंगणवाडी केंद्रावर उपस्थित नाहीत. त्यांचे हे तिसरे आपत्य असल्याची चर्चा गावात सुरू आहे. शासनाच्या नियमानुसार, दोनपेक्षा जास्त आपत्य असलेल्या व्यक्तींना अंगणवाडी सेविका म्हणून काम करता येत नाही. त्यामुळे, या नियमाचे उल्लंघन टाळण्यासाठीच त्यांनी प्रसुतीची आणि तिसऱ्या अपत्याची माहिती जाणीवपूर्वक लपवली आणि दीर्घकाळापासून गैरहजर राहिल्याचा आरोप रमेश संताराम राठोड यांनी दिलेलल्या निवेदनातुन केले आहे. या प्रकारामुळे अंगणवाडी केंद्राचे कामकाज पूर्णपणे ठप्प झाले आहे. लहान मुलांना मिळणारे पोषण आहार, लसीकरण आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाचे लाभ त्यांना मिळत नाहीत. याचा थेट परिणाम या भागातील बालकांच्या आरोग्यावर आणि विकासावर होत आहे.स्थानिक ग्रामस्थांनी या प्रकाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार मौजे रत्ननगर तांडा जळगव्हाण ता.परळी वै. जि. बीडयेथील अंगणवाडी सेविका अंगणवाडी केंद्रा मध्ये मागील सहा महिण्यापासून प्रसुती करीता तिसरे अपत्य लपविण्यासाठी खाजगी कारण पुढे करत गैरहजर आहे. त्याच्या खाजगी कारणामध्ये कसल्याही प्रकारचे तथ्य नाही हे केवळ निमित्त आहे. संबंधीत विभागास एकात्मिक व महिला बालविकास सेवा योजना विभाग कार्यालय, परळी वै. बीड यांना वेळोवेळी दिनांक १७.०६.२०२५ व दिनांक २३.०६.२०२५ रोजी कळविलेले आहे. तसेच अमरण उपोषणाचा ईशारा संबंधीत कार्यालयास दिला होता. अपेक्षीत कार्यवाही नूसार विभागाकडून अंगणवाडी सेविका यास नोटीस जारी केली होती. मी माझे उपोषण दिनांक ३०.०६.२०२५ रोजीचे कार्यवाहीस लागणारा वेळ लक्षात घेता अमरण उपोषण स्थगित केले. परंतू पुढील अपेक्षीत कार्यवाही नुसार विभागाकडून प्रसुती संदर्भात कोणत्याही प्रकारची चौकशी न करता टाळाटाळ केलेली आहे. खाजगी कारणास्तव गेली असल्या कारणाने कार्यालयाचे म्हणणे आहे. परंतू संबंधीत सेविका ही कार्यालयाची दिशाभुल करत आहे अथवा संबंधीत विभाग अंगणवाडी सेविकेस सहकार्य करत आहे असे दिसून येते.

एवढेच नाही तर सेविकेकडून २०२० पासून चालू अंगणवाडीचे हजेरीपट फोटो अपलोड करणे गरजेचे असतांना कधीतरी अमावश्या पोर्णिमेला घरी बसून आपली हजेरी लावलेली संबंधीत विभागाच्या पोर्टलवर दिसून येईल. अजुन खाऊवाटपा मध्ये मोठा अपहार सुध्दा केलेला आहे. रतन नगर तांडा येथील अंगणवाडी महाराष्ट्रात गैरप्रकारामध्ये अव्वल स्थानी आहे. यावर वेळीच आळा घालने गरजेचे आहे. नाहीतर याचा पायंडा पडूशकतो. आज रोजी अंगणवाडी सेविका प्रसुती करीता तिसरे अपत्य लपविण्यासाठी गायब आहे. संबंधीत विभागाने टाळाटाळ केली असल्या कारणाने यावेळी प्रसुती संदर्भात प्रसुती झाली आहे किंवा नाही हे पाहणे गरजेचे आहे. या तक्रारीमध्ये कोणतेही तथ्य नसल्यास मी रमेश संताराम राठोड रा. जळगव्हाण ता. परळी वै. जि. बीड कोणत्याही कायदेशीर कार्यवाहीस सामोरे जाण्यास तयार आहे. या आधी आपल्या कार्यालया वेळोवेळी कळविले आहे, हे प्रकरण अत्यंत गंभीर असून या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात न घेता कार्यवाही झाली नाही तर दिनांक २९.०७.२०२५ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड या आपल्या कार्यालय समोर अमरण उपोषणास बसत आहे याची नोंद घ्यावी. तसेच वेळीच चौकशी करून संबंधीतावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अस रमेश संताराम राठोड यांनी दिलेल्या एका निवेदनातुन म्हणटे आहे.

---

## आडस-अंबाजोगाई रस्ता निसर्गाच्या सान्निध्यात

धारूर, आडस । प्रतिनिधी

केज विधानसभा मतदारसंघाच्या आमदार नमिता मुंदडा यांनी मतदारसंघात भरघोस निधी आणून रस्त्यांचा विकास केला असून, आडस-अंबाजोगाई रस्त्यासाठी निधी आणून नूतनीकरण केले आहे. या रस्त्यावर दोन्ही बाजूने वृक्षलागवड सुरू झाल्याने हा रस्ता आता 'ग्रीन मार्ग' ठरणार आहे. केज मतदारसंघातील अनेक रस्त्यांची दैना झाली होती. यामुळे मतदारसंघातील जनतेला अडचणींचा सामना करावा लागत होता. जनतेची ही अडचण ओळखून भरघोस निधी मंजूर करुन आणला होता. या माध्यमातून मतदारसंघातील अनेक रस्त्यांचे नूतनीकरण करुन जनतेला दिलासा दिला.



आडस-अंबाजोगाई हा मतदारसंघातील प्रमुख रस्ता असून याही रस्त्याची मोठी दुरावस्था झाली होती. रुंदी कमी आणि वळण जास्त असल्याने या रस्त्यावर अपघातांची संख्या वाढली होती. याची दखल घेत केंद्रीय रस्ते विकास निधीतून ५२ कोटींचा निधी मंजूर करुन घेतला होता. यातून या रस्त्याचे नूतनीकरण करुन उमराई शिवारापर्यंत चौपदरी रस्ता करण्यात आला. त्यापुढे रस्त्याचे नुतनीकरण करण्यात आले आहे. यामुळे हा रस्ता आता गुळगुळीत झाला असून जिथे अंबाजोगाईला जाण्यासाठी पावून तास लागत होता तिथे आता केवळ २० मिनिटांत पोहोचता येतं आहे. पर्यायाने संरक्षण करण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी पाऊल उचलले असून या रस्त्याच्या दुतर्फा वृक्ष लागवड सुरू केली आहे. जर या झाडांचे इमानेइतबारे संवर्धन केले तर हाआडस-अंबाजोगाई रस्ता निसर्गाच्या सान्निध्यात ठरणार आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT